




दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25








अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५१। किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार। २३/०६/२०२६ । पाने - ६







## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी 97,706 कोटींच्या पुरवणी मागण्या




महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य सरकारने तब्बल ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या विधानसभेच्या पटलावर सादर केल्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी तसेच विविध कल्याणकारी आणि विकास योजनांवरील वाढता खर्च लक्षात घेता सरकारला या अतिरिक्त आर्थिक तरतुदींची आवश्यकता भासल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रचंड रकमेच्या पुरवणी मागण्यांमुळे राज्याच्या आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून विरोधकांकडूनही यावर टीका होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सोमवारी (दि. २२ जून) अधिवेशनाच्या प्रारंभी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर दिवंगत नेत्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर तालिका सभापती व अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. यानंतर सरकारने पुरवणी मागण्या सभागृहाच्या पटलावर मांडल्या.

वित्त विभागाने जारी केलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनानुसार, चालू आर्थिक वर्षासाठी महसुली आणि भांडवली खात्यांवर मिळून ९७,७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे. सरकारने या पुरवणी मागण्यांमागे चार प्रमुख कारणे नमूद केली आहेत. विधिमंडळाच्या मंजुरीच्या अपेक्षेने आधीच हाती घेतलेल्या तातडीच्या कामांवरील अतिरिक्त खर्च, नवीन सेवा व प्रकल्पांसाठी आवश्यक निधी, चालू आर्थिक वर्षातील खर्चाच्या प्रगतीनुसार वाढीव तरतुदी (पान ५ वर)

# गोकुळ गीतेंनी शिवसेनेचा उमेदवार पाडला

## विधानपरिषदेवर महायुतीचा झेंडा, महाआघाडीचा दारूण पराभव

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिक विधान परिषदेसाठी केलेल्या ६१८ मतदानापैकी ३५७ मते मिळवून अपक्ष उमेदवार गोकूळ गीते यांनी महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा दारूण पराभव केला. या पराभवाने महायुतीमध्ये खळबळ उडाली असून दराडे यांनी या पराभवाचे खापर मंत्री गिरीष महाजन यांच्यावर फोडले आहे. तर गीते यांना ठाकरे गटाने मदत केल्याचे बोलले जात आहे.



राज्यात विधान परिषदेच्या झालेल्या १७ जागांपैकी १६ जागांवर महायुतीचे व एका जागेवर अपक्ष निवडून आले. तर महाविकास आघाडीमधील तिन्ही पक्षाला या निवडणूकीत खाते देखील उघडता आले नाही. त्यामुळे महायुतीचा या निवडणूकीत एक हाती झेंडा फडकला.

राज्याचं लक्ष लागलेल्या सांगली सातारा विधान परिषदेचा निकाल जाहीर झाला असून भाजपच्या धैर्यशील कदम यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा मोठा पराभव केला आहे. धैर्यशील कदम यांनी ५९३ मतं मिळवत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार अभयसिंह जगताप यांचा ३०१ मतांनी पराभव केला. अभयसिंह जगताप यांना २९२ मतं मिळाली आहेत. हा निकाल म्हणजे जयंत पाटील यांच्या राजकारणासाठी मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे.

दरम्यान दहा दहा लाख रुपये देऊन १०० मतांची क्रॉस वोटिंग करून घेतल्याचा गंभीर आरोप नागपूर विधानपरिषद मतदारसंघातून काँग्रेसचे पराभूत उमेदवार अतुल लोंढे यांनी केला. महाविकास आघाडी आणि काँग्रेसच्या फुटलेल्या मतांसंदर्भात तक्रार करणार नाही असेही अतुल लोंढे म्हणाले.

या निवडणुकीची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे रविवारी उर्वरित ११ जागांसाठी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. या ११ पैकी १० जागांवर महायुतीने निर्विवाद वर्चस्व मिळवले, तर एका जागेवर बंडखोराने महायुतीचे गणित बिघडवले.

### १७ मतदारसंघातील विजयी उमेदवार

ठाणे मतदारसंघातून शिवसेनेचे रवींद्र फाटक, यवतमाळ शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे, पुणे - राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रम काकडे, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर भाजपचे अरुण लखाणी आणि अहिल्यानगर - भाजपचे प्राजक्त तनपुरे हे उमेदवार बिनविरोध निवडून आले. तर छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघातून भाजपचे सुहास शिरसाट, नाशिक- भाजप समर्थित अपक्ष उमेदवार गोकुळ गीते, भंडारा-गोंदिया-भाजपचे अविनाश ब्राह्मणकर, सांगली-सातारा भाजपचे धैर्यशील कदम, परभणी-हिंगोली शिवसेनेचे सईद खान, सोलापूर - भाजपचे राजेंद्र राऊत, धाराशिव-लातूर-बीड भाजपचे बसवराज पाटील, नागपूर - भाजपचे राजीव पोतदार, जळगाव - भाजपचे नंदकिशोर महाजन, अमरावती- भाजपचे प्रवीण पोटे आणि नांदेड मतदारसंघातून भाजपचे अमर राजूरकर विजयी झाले.

## भंडारदरा पाणलोटात पावसाचे आगमन...


छाया - विलास तुपे, राजूर

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - पावसाचे आगार समजणारे भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात रविवारी सायंकाळपासून पावसाने दमदार हजेरी लावल्याने परिसरातील वातावरण बदलले आहे. भात शेतीला या पावसाचा फायदा होत असून धरणातही नवीन पाण्याची आवक सुरू झाली आहे.

कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड, तसेच घाटघर परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे ओढे-नाले वाहू लागले. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात नवीन पाण्याची आवक सुरू झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेतील शेतकऱ्यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. खरीप हंगामाच्या पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग येणार असून, शेतकऱ्यांमध्ये काहीसे समाधानाचे वातावरण आहे. भात, नागली, वरई, तसेच अन्य पिकांच्या लागवडीसाठी हा पाऊस उपयुक्त ठरणार असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

भंडारदरा परिसरातील डोंगररांगा धुक्याने वेढल्या गेल्याने निसर्गसौंदर्यात भर पडली. अनेक ठिकाणी लहान-मोठे धबधबे वाहू लागल्याने पर्यटकांनाही आकर्षण निर्माण झाले. हवामान खात्याने पुढील काही दिवस तालुक्यात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला. पाणलोट क्षेत्रात आणखी पावसाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पावसाच्या दमदार सुरुवातीमुळे भंडारदरा धरणाच्या जलसाठ्यात वाढ होण्याची आशा निर्माण झाली. शेतकरी, नागरिक आणि पर्यावरण प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. भंडारदरा, निळवंडे हे दोन्ही धरणे तुडूंब भरल्यास लाभ क्षेत्रातील लाखो हेक्टर शेती व लाखो नागरीकांची सोय होणार आहे.

## संगमनेरमध्ये भेसळयुक्त दुध विक्रीची चौकशी करा

### ज्येष्ठ नागरिक महासंघाची अन्न व औषध प्रशासनाकडे मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील विविध चौकांमध्ये सकाळी व सायंकाळी मोठ्या प्रमाणात विना ब्रँड, विना नावाचे कच्चे दूध विक्रीसाठी उपलब्ध होत असून या दुधामध्ये पाणी व इतर पदार्थांची भेसळ होत असल्याचा गंभीर आरोप संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरिक महासंघाने केला आहे. या पार्श्वभूमीवर दुधाचे आकस्मिक नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करावी व दोर्षीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महासंघाने अन्न व औषध प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महासंघाचे अध्यक्ष तथा राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ तात्याबा कळसकर गुरुजी यांनी सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, अहिल्यानगर यांना सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील तिरंगा चौक, महात्मा फुले चौक, साई श्रद्धा चौक, ऑरेंज कॉर्नर, गणेश नगर चौक, बी.एड. कॉलेज सर्कल, नगर रोड, सय्यद बाबा चौक, नेहरू चौक तसेच गोल्डन सिटी गेट परिसरात प्लास्टिक पिशव्यांमधून कच्च्या दुधाची विक्री सुरू आहे. शेतकरी असल्याचे सांगून काही एजंट नागरिकांना दूध विकत असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ केली जात असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



या दुधाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याने ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असून त्यांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित ठिकाणी अचानक धाडी टाकून दुधाचे नमुने संकलित करावेत व मान्यताप्राप्त प्रयोगशाळेत तपासणी करून दोर्षीवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय शहरात विक्री होणाऱ्या विविध ब्रँडच्या पिशवीबंद दुधाचे नमुनेही तपासणीसाठी (पान ५ वर)














# चिखली घाटातील ट्रान्सफॉर्मर वर्कशॉप दरोडा प्रकरण उघड

## आंतरराज्य टोळीतील बोटा येथील ७ सराईत गुन्हेगार जेरबंद

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत कोळगाव गावच्या शिवारातील चिखली घाट परिसरातील ट्रान्सफॉर्मर रिपेअरिंग वर्कशॉपवर शस्त्रांचा धाक दाखवून दरोडा टाकणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश करण्यात बेलवंडी पोलिसांना मोठे यश आले आहे. या प्रकरणी सात सराईत गुन्हेगारांना अटक करण्यात आली असून, आरोपी मूळचे उत्तर प्रदेश व बिहार राज्यातील रहिवासी आहेत. ते सध्या संगमनेर तालुक्यातील बोटा परिसर तसेच पुणे जिल्ह्यात वास्तव्यास होते.



अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये नजीबउल्ला चम्मन सहा (वय ३२), अमितकुमार मुन्ना सरोज (वय २०), रवि ब्रिजलाल अग्रवाल (वय ३४), सुभाषचंद्र ब्रिजलाल अग्रवाल (वय ४४), लालुकुमार कामेश्वर चौधरी (वय २२), शिवपुजन रामकुमार अग्रहरी (वय २७) आणि कलामउद्दीन कमरउद्दीन ठाकुर (वय ४१) यांचा समावेश आहे.


पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ एप्रिल २०२६ रोजी मध्यरात्री १२ ते पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान कोळगाव शिवारातील चिखली घाट येथे असलेल्या ‘युको सिस्टीम ट्रान्सफॉर्मर रिपेअरिंग’ वर्कशॉपवर हा धाडसी दरोडा टाकण्यात आला होता. चार दरोडेखोरांनी वर्कशॉपच्या मागील बाजूचे पत्रे उचकटून आत प्रवेश केला. तेथे उपस्थित असलेले मजूर आणि वॉचमन सुभाष आनंदा पवार (रा. घुटेवाडी, ता. श्रीगोंदा) यांचे हात टेपने पाठीमागे बांधून त्यांना चाकूचा धाक दाखवण्यात आला. सकाळपर्यंत बाहेर आलात तर जीव घेऊ, अशी धमकी देत आरोपींनी वर्कशॉपचे मुख्य शटर उघडले आणि बाहेर थांबलेल्या त्यांच्या अन्य साथीदारांनाही आत बोलावून घेतले. त्यानंतर टोळीने वर्कशॉपमधील ट्रान्सफॉर्मरमधील लाखो रुपयांचे मौल्यवान तांबे (कॉपर) तसेच इतर साहित्य जबरदस्तीने चोरून नेले. या घटनेप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ११०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान संबंधित आरोपी शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अन्य गुन्ह्यात अटकेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर न्यायालयाच्या परवानगीने बेलवंडी पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला. दरम्यान, या टोळीने महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारचे दरोडे किंवा चोरीचे गुन्हे केले आहेत का, याचाही सखोल तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही उल्लेखनीय कारवाई सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार भाऊसाहेब यमगर, पोलीस शिपाई कैलास शिपणकर, दादासाहेब क्षीरसागर, विनोद पवार, आदित्य बेलेकर, चालक भाऊसाहेब शिंदे, विकास सोनवणे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस नाईक प्रताप देवकाते, राहुल गुंडू आणि नितीन शिंदे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# उद्योगांना आवश्यक परवानग्या व मूलभूत सुविधा वेळेत उपलब्ध करून द्या - जिल्हाधिकारी

अहिल्यानगर, दि.२२- जिल्ह्यात औद्योगिक विकासाला अधिक गती देण्यासाठी उद्योगांना विविध विभागांकडून आवश्यक असलेल्या परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर प्रशासकीय मंजुरी विहित कालावधीत उपलब्ध करून द्याव्यात. तसेच उद्योगांना वीज, पाणी, रस्ते यासह सर्व मूलभूत सुविधा विनाविलंब उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित उद्योगविषयक आढावा बैठकीत डॉ. पंकज आशिया बोलत होते.




जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, औद्योगिक विकास हा जिल्ह्याच्या आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा आधार असून उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. नवीन उद्योगांना प्रोत्साहन देतानाच विद्यमान उद्योगांच्या अडचणी दूर करणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे सर्व विभागांनी उद्योगस्नेही दृष्टीकोन ठेवून कार्य करावे आणि प्रलंबित विषयांवर कालबद्ध कार्यवाही करण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी केल्या.

उद्योगवाढीसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यावर भर देत विविध विभागांनी उद्योगांच्या प्रस्तावांबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी. उद्योगांना आवश्यक मंजुरी व परवानग्या वेळेत मिळाल्यास नवीन गुंतवणुकीला चालना मिळेल आणि रोजगारनिर्मिती वाढण्यास मदत होईल, असेही ते म्हणाले.

औद्योगिक वसाहतींमधील पायाभूत सुविधांचा आढावा घेताना जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा पाईपलाईन, सांडपाणी व्यवस्थापन, वीज वितरण व्यवस्था तसेच इतर आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात. औद्योगिक क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एमआयडीसी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करून प्रलंबित कामांना गती द्यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

बैठकीत उद्योजकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व निवेदनांवर सात दिवसांमध्ये कार्यवाही करून त्यांचे निराकरण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.


मा. श्री. अंकुश अभंग

अभंग ग्रुप, सेलिब्रेशन रेस्टॉरंट अँड कॅफे, सेव्हन्थ हेवन केक शॉपचे संचालक

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता


# भारताच्या नौदल ताफ्यात तीन स्वदेशी युद्धनौकांचा समावेश

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

भारतीय नौदलाच्या इतिहासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत रविवारी एकाच वेळी तीन अत्याधुनिक स्वदेशी जहाजांचा नौदल ताफ्यात समावेश करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील श्यामा प्रसाद मुखर्जी बंदरात आयएनएस अग्रय, आयएनएस दुनागिरी आणि आयएनएस संशोधक ही तीन जहाजे राष्ट्राला समर्पित केली. या तिन्ही जहाजांच्या समावेशामुळे भारताची सागरी सुरक्षा, देखरेख आणि युद्धक्षमता अधिक मजबूत होणार आहे.आयएनएस संशोधक हे भारतीय नौदलाचे अत्याधुनिक सर्वेक्षण जहाज असून ते ‘संधायक’ श्रेणीतील चौथे आणि अंतिम जहाज आहे. खोल समुद्र तसेच किनारी भागांतील हायड्रोग्राफिक सर्वेक्षणासाठी हे जहाज विशेष तयार करण्यात आले आहे. कोलकाता येथील गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स येथे तयार करण्यात आलेल्या या जहाजात ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी साहित्याचा वापर करण्यात आला आहे. डिजिटल साइड-स्कॅन सोनार आणि स्वायत्त पाण्याखालील वाहनांसारख्या अत्याधुनिक उपकरणांनी ते सज्ज आहे. सुमारे ३,४०० टन वजनाचे हे जहाज शोध आणि बचाव मोहिमांसाठीही उपयुक्त ठरणार आहे.आयएनएस संशोधक हे भारतीय नौदलाचे अत्याधुनिक सर्वेक्षण जहाज असून ते ‘संधायक’ श्रेणीतील चौथे आणि अंतिम जहाज आहे. खोल समुद्र तसेच किनारी भागांतील हायड्रोग्राफिक सर्वेक्षणासाठी हे जहाज विशेष तयार करण्यात आले आहे. कोलकाता येथील गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स येथे तयार करण्यात आलेल्या या जहाजात ७५ टक्क्यांहून अधिक स्वदेशी साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

# राष्ट्रसेवेसाठी सज्ज झालेल्या अग्निवीरांनी घेतली निष्ठेची शपथ



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल (एमआयसी अँड एस), अहिल्यानगर येथे १ हजार ५२२ अग्निवीरांचा भव्य शपथविधी-परेड सोहळा संपूर्ण लष्करी दिमाखात संपन्न झाला. २४ आठवड्यांचे कठोर आणि सर्वसमावेशक लष्करी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर या अग्निवीरांनी राष्ट्रसेवेसाठी स्वतःला समर्पित करण्याची शपथ घेतली. या सोहळ्याने नव्याने भरती झालेल्या तरुणांचे शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि राष्ट्रनिष्ठ सैनिकांमध्ये झालेले यशस्वी रूपांतर अधोरेखित केले. या दिमाखदार समारंभात अग्निवीरांनी भारतीय सैन्य तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंटच्या गौरवशाली परंपरा, मूल्ये आणि शौर्याचा वारसा जपण्याची शपथ घेतली. उत्कृष्ट ड्रिल, लष्करी अचूकता आणि शिस्तबद्ध संचलनामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले ब्रिगेडियर पी. सुनील कुमार यांनी परेडची सलामी स्वीकारली. त्यांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सर्व अग्निवीरांचे अभिनंदन करताना त्यांच्या समर्पण, चिकाटी आणि उच्च शिस्तीचे कौतुक केले. भारतीय सैन्याच्या आदर्शांचा सन्मान राखत कर्तव्यनिष्ठेने राष्ट्रसेवा करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

समारंभाला अग्निवीरांचे पालक आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पाठिंब्याने, त्यागाने आणि प्रोत्साहनाने या तरुण सैनिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. राष्ट्राच्या भावी रक्षकांचे संगोपन केल्याबद्दल पालकांचा विशेष गौरव करण्यात आला तसेच त्यांना गौरवपदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

शपथविधी-परेड हा प्रत्येक अग्निवीराच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा असून या सोहळ्यानंतर ते भारतीय सैन्याच्या विविध युनिट्समध्ये राष्ट्रसेवेसाठी कार्यरत होणार आहेत. या समारंभातून भारतीय सैन्य आणि मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल यांची राष्ट्राची सार्वभौमता आणि अखंडता जपण्यासाठी सक्षम, प्रेरित, शिस्तबद्ध आणि युद्धसज्ज सैनिक घडविण्याची दृढ बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली.

# लाखो झाडे लावली जातात पण ती जगतात किती ?

पावसाळा सुरू झाला की राज्यभर वृक्षारोपण मोहिमांचा उत्साह पाहायला मिळतो. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना आणि नागरिक यांच्या सहभागातून लाखो रोपे लावली जातात. पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला जातो आणि हरित भविष्यासाठी संकल्पही केले जातात. मात्र या सगळ्या उपक्रमांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न अनेकदा दुर्लक्षित राहतो- लावलेली झाडे प्रत्यक्षात किती जगतात? कारण झाडे लावणे जितके महत्त्वाचे आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणे आहे.आज जग हवामान बदलाच्या गंभीर संकटाला सामोरे जात आहे. वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर आणि उष्णतेच्या लाटा यामुळे पर्यावरणीय समतोल बिघडत आहे. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे हरित क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. अशा परिस्थितीत वृक्षसंवर्धन हा पर्यावरण वाचविण्याचा सर्वात प्रभावी आणि नैसर्गिक उपाय मानला जातो. झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, हवा शुद्ध करतात, भूजल पातळी वाढवतात आणि जैवविविधतेचे संरक्षण करतात. त्यामुळे वृक्षांचे महत्त्व आज पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे.दरवर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जाते. अनेकदा लाखो रोपे लावल्याचे दावे केले जातात. परंतु काही महिन्यांनंतर किंवा वर्षभरानंतर पाहिले असता अनेक रोपे




वाळलेली किंवा नष्ट झालेली दिसतात. वृक्षारोपणाचे कार्यक्रम उत्साहात पार पडतात; मात्र त्यानंतरची देखभाल दुर्लक्षित राहते. परिणामी मोठ्या प्रमाणावर रोपे जगू शकत नाहीत. यामुळे खर्च झालेला निधी, मनुष्यबळ आणि श्रम यांचे अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत.झाडे न जगण्यामागे अनेक कारणे आहेत. अनेक वेळा स्थानिक हवामान, जमिनीचा प्रकार आणि पाण्याची उपलब्धता यांचा विचार न करता वृक्षलागवड केली जाते. काही ठिकाणी योग्य प्रजातींची निवड केली जात नाही. त्याचबरोबर पावसाळा संपल्यानंतर रोपांना आवश्यक पाणी मिळत नाही. पहिल्या काही वर्षांत झाडांची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. मात्र अनेक ठिकाणी रोपे लावल्यानंतर त्यांच्याकडे पुन्हा लक्ष दिले जात नाही.ग्रामीण भागात मोकाट जनावरांमुळेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. संरक्षक जाळी किंवा कुंपण नसल्याने नव्याने लावलेली रोपे तुडवली जातात किंवा खाल्ली जातात. काही ठिकाणी मानवी निष्काळजीपणामुळेही झाडांचे नुकसान होते. त्यामुळे वृक्षारोपणाबरोबरच संरक्षणाच्या उपाययोजनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.वृक्षसंवर्धनाचा संबंध केवळ पर्यावरणाशी नाही, तर शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशीही आहे. झाडांमुळे मातीतील ओलावा टिकून राहतो, जमिनीची धूप कमी होते आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे भूजल पातळी वाढते. अनेक पक्षी, प्राणी आणि इतर जीवसृष्टीचे अस्तित्वही वृक्षांवर अवलंबून असते. त्यामुळे झाडांचे संरक्षण म्हणजे संपूर्ण पर्यावरणीय साखळीचे संरक्षण होय.आज आवश्यक आहे ती वृक्षारोपणाच्या संख्येपेक्षा वृक्षांच्या अस्तित्वाची मोजणी. किती रोपे लावली यापेक्षा किती झाडे जिवंत राहिली यावर यशाचे मोजमाप झाले पाहिजे. प्रत्येक वृक्षारोपण मोहिमेसोबत किमान तीन ते पाच वर्षांच्या देखभालीची व्यवस्था असणे आवश्यक आहे. पाणी, खत, संरक्षण आणि नियमित निरीक्षण यासाठी स्वतंत्र नियोजन झाले पाहिजे.शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड दत्तक घेऊन त्याची काळजी घेतली तर मोठा बदल घडू शकतो. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि नागरिक यांनी एकत्रितपणे परिसरातील झाडांचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. वृक्षसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.आज पर्यावरण संवर्धनासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करण्याची गरज निर्माण झाली आहे. जसे एखाद्या संकटाच्या वेळी सर्व यंत्रणा एकत्रितपणे काम करतात, तसेच वृक्षसंवर्धनासाठीही व्यापक लोकचळवळ उभी राहिली पाहिजे. झाडे लावण्याबरोबरच ती जगविण्याचा निर्धार प्रत्येकाने केला पाहिजे. कारण लावलेले प्रत्येक झाड हे भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित पर्यावरणाची हमी असते.आपल्या पूर्वजांनी लावलेल्या झाडांच्या सावलीचा लाभ आपण घेत आहोत. आता पुढील पिढ्यांसाठी हिरवेगार भविष्य निर्माण करण्याची जबाबदारी आपली आहे. त्यामुळे लाखो झाडे लावण्यापेक्षा लाखो झाडे जगविण्याचा संकल्प करणे अधिक महत्त्वाचे आहे. पर्यावरणाचे रक्षण, हवामान बदलाचा मुकाबला आणि मानवजातीचे सुरक्षित भविष्य यासाठी वृक्षसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची वेळ आता आली आहे.ा

# कृषी अनुदानासह लोडशेडिंगचा प्रश्नही तातडीने सोडवा - पानसरे

युवावार्ता (प्रतिनिधी०

संगमनेर - पावसाळा सुरू होऊन पाऊस पडत नाही. कर्जमाफीची फसवी घोषणा झाली कर्जमाफी मिळत नाही. अनुदानाच्या घोषणा होऊन अद्याप कृषी अवजारांची अनुदान मिळाले नाही. शेतकरी अत्यंत अडचणीत आला आहे. अशा परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने कृषी अवजारांचे अनुदान द्यावे अशी मागणी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा घुलेवाडी गावचे माजी सरपंच भास्करराव पानसरे यांनी केली.



शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सरकारला प्रश्न विचारताना भास्करराव पानसरे म्हणाले की, सध्याचे सरकार हे शेतकऱ्यांच्या जीवावर निवडून आले आहे. संपूर्ण कर्जमाफी करण्याची आश्वासन दिले आणि आता मात्र कोणतीही कर्जमाफी मिळत नाही. शेतकऱ्यांना अवजारे दिली त्यावर अनुदान देणे गरजेचे आहे. अनुदान देण्याची घोषणा करूनही अद्याप एक रुपया अनुदान मिळाले नाही त्यामुळे सर्व शेतकरी अडचणीत आले आहे. वेळेवर लाईट मिळत नाही. ग्रामीण भागामध्ये दररोज रात्री चार तास लोड शेडिंग ठेवले आहे विद्यार्थ्यांचा अभ्यास सुरू आहे अशा सर्व परिस्थितीमध्ये लोड शेडिंग बंद करा. रात्रीची कमीत कमी वन फेज लाईट सर्वत्र सुरू पाहिजे.

अडचणीचे दिवस आहेत शेतकरी सर्वसामान्य माणूस अडचणीत आहे. पाऊस नाही अशा सर्व परिस्थितीमध्ये सरकारने भांडवलदारांकडे लक्ष न देता शेतकरी व गोरगरिब माणसाकडे लक्ष दिले पाहिजे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी ४० वर्ष मोठ्या कष्टातून संगमनेर तालुका उभा केला. सर्व क्षेत्रांमध्ये आज तालुक्याचा नावलौकिक आहे मात्र मागील दोन वर्षांमध्ये काही लोकांनी नाव घालवण्याचा प्रयत्न केला. संगमनेर तालुक्याचे पाणी पळवले लाईट मिळत नाही रेल्वे पळवली ही सर्व चूक संगमनेर तालुक्यातील जनतेच्या लक्षात आली असून तातडीने सरकारने सुधारणा करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा ज्येष्ठ नेते भास्करराव पानसरे यांनी दिला आहे.

# १ जुलैपासून मान्सून सक्रिय होणार

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात जून महिन्याच्या सुरुवातीला दाखल झालेला मान्सून गेल्या काही दिवसांपासून रखडल्यामुळे राज्यात चिंतेचे वातावरण आहे. ६ जून रोजी तळकोकणात आगमन झाल्यानंतर ८ जूनपासून मान्सून दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर येथे एकाच जागी स्थिर आहे. अनुकूल हवामान प्रणाली अभावी मान्सूनचा प्रवास मंदावला असून राज्यात जून महिन्याच्या सरासरीच्या केवळ २२ टक्के पावसाची नोंद झाली आहे. परिणामी, राज्यात तब्बल ७८ टक्के पावसाची मोठी तूट निर्माण झाली असून शेतकरी आणि नागरिकांची चिंता वाढली आहे. मात्र, आता हवामान विभागाने दिलासादायक अंदाज व्यक्त केला आहे. बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात मान्सूनच्या पुढील वाटचालीला गती देणारी हवामान प्रणाली सक्रिय होत आहे. २३-२४ जूनपासून परिस्थिती अनुकूल होऊन २५ जूननंतर पावसाचा जोर वाढेल आणि १ जुलैपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. दरम्यान, रविवारी सकाळपासून मुंबईसह उपनगराच्या काही भागांत पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरातील पूर्वेकडील व ईशान्येकडील वारे आणि अरबी समुद्रातील उत्तरेकडील वाऱ्यांमधील तफावत, गुजरात ते ओडिशा दरम्यान निर्माण झालेला उच्च दाबाचा पट्टा, तसेच हिमालयाच्या पश्चिम भागातील चक्रवाताचा प्रभाव यामुळे मॉन्सूनची प्रगती मंदावली आहे.`.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# संगमनेर तालुक्यात योगदान साजरा

## वडगाव पान विद्यालयात 1000 विद्यार्थ्यांच्या साखळीने योग प्रतिकृती



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -सह्याद्री संस्थेच्या डी. के. मोरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडगाव पान येथे २१ जून रोजी १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीच्या निरोगी वृद्धत्वासाठी योगा (धेसर षी क्शरश्रींहू -सळपस) या संकल्पनेला अनुसरून विद्यालयातील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून विविध योगासने आणि प्रात्यक्षिके सादर केली.

वय वाढत असताना शरीराची लवचिकता कमी होणे, सांधेदुखी, स्नायूंची कमजोरी, संतुलन बिघडणे तसेच मानसिक तणाव यांसारख्या समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत नियमित योगाभ्यास आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो, हा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.

योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आरोग्य, ज्ञान आणि जागतिक शांततेसाठी योग या संकल्पनेवर भर देण्यात आला. पर्यावरण संरक्षण, मानवी आरोग्य, मानसिक संतुलन आणि वैश्विक एकता यांचा समन्वय साधण्यासाठी योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून सर्वांगीण आरोग्याचा पाया असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विद्यालयाचे प्राचार्य पोपट दये यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडाशिक्षक बाळासाहेब कांडेकर व कलाशिक्षक सत्यानंद कसाब यांनी या उपक्रमाचे नियोजन केले. त्यांना विकास पवार, भारत सोनवणे, प्रकाश नेहे, रवींद्र काशीद, गोरख कांबळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

योगशिक्षक बाळासाहेब कांडेकर यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली. यावेळी प्राचार्य पोपट दये, उपमुख्याध्यापक प्रताप आहेर, ज्युनिअर कॉलेज इंचार्ज प्रा. संध्या निकम यांच्यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही योगाभ्यासात सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे व्हिडिओ चित्रीकरण विवेक काशीद व प्रणव काशीद यांनी केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे योग दिनाचा कार्यक्रम प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

## सह्याद्री विद्यालय, एकविरा फाउंडेशन व जयहिंद लोकचळवळीच्या वतीने योग दिन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये प्रत्येकाला स्वतःचे आरोग्य सांभाळणे अत्यंत गरजेचे असून योगामुळे शरीर लवचिक होते त्यामुळे प्रत्येकाने नियमित योगासने करा असे आवाहन जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी केले असून योगा हा भारताची जगाला देण असल्याचे कॅन्सर तज्ञ डॉ.जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे. योग दिनामध्ये आज १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेज एकविरा फाउंडेशन आणि जयहिंद लोक चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. यावेळी मा.आ.डॉ.सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे,डॉ.प्रमोद राजुस्कर,डॉ.कर्पे,सौ.प्रमिला अभंग,डॉ.अनुराधा सातपुते,प्राचार्य एस.एम.खेमनर, इन्फिनिटी योगाचे प्रशिक्षक रितेश सोनवणे, योगशिक्षक सातपुते किशोर देशमुख,मिलिंद औटी,भारत शिंदे,जगन गवांदे, पर्यवेक्षक सुरेखा दिघे, एस.आर.रणशूर,अण्णासाहेब दिघे,संजय वर्पे,मिनिनाथ वर्पे आदींसह सर्व शिक्षक व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सह्याद्री विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या १५०० विद्यार्थी व एकवीरा आणि जयहिंद लोकचळवळ मधील युवकांनी एकत्रित योगाचे विविध प्रकार करत योग दिन साजरा केला.

याप्रसंगी बोलताना मा.आ.डॉ.तांबे म्हणाले की, माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरता सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. धावपळीच्या जीवनामध्ये आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सुद्धा आरोग्याला जपा हा मंत्र दिला आहे. याचबरोबर स्वतःच्या शरीराकडे लक्ष द्या ही शिकवण दिली आहे.योग ही प्रत्येकाने जीवनशैली करावी. दररोज वीस मिनिटे तरी योग करा. योगासनामुळे शरीर लवचिक होत असून शरीरासाठी अत्यंत चांगला असलेला सूर्यनमस्कार हा प्रकार प्रत्येकाने जास्तीत जास्त करावा असे आवाहन त्यांनी केले.

तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, योग ही भारताची जगाला देण असून योगामुळे शरीर चांगले राहते. योग दिनाच्या निमित्ताने फक्त एक दिवस योग न करता स्वतःसाठी दररोज प्रत्येकाने योग करा. थोडा वेळ स्वतःसाठी काढा.

## नूतन विद्यालय राजापूर येथे योग दिन



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर - प्रागतिक शिक्षण संस्थेच्या नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजापूर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयातील तब्बल ४३० विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

भारताने संपूर्ण जगाला दिलेली अमूल्य देणगी म्हणजे योग. शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी योगाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या प्रात्यक्षिकांद्वारे दर्शविले. विविध योगासने करताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व शिस्त यांचे उत्कृष्ट दर्शन घडले.

कार्यक्रमास प्रागतिक शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, राजापूर केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. सदानंद डोंगरे, प्राचार्या छाया तळोळे, पर्यवेक्षक सुनील दाभाडे, ज्युनिअर कॉलेजच्या प्रभारी शोभा अभंग यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. योग प्रात्यक्षिकांचे नियोजन व मार्गदर्शन विद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक श्री. शिरसाट व श्री. बोऱ्हाडे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून योगासनांचे विविध प्रकार सादर करून घेत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात योगदान दिले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण झाली. निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला.

## स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये योग दिन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूल, संगमनेर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन व जागतिक संगीत दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य या होत्या.

यावेळी विद्यार्थ्यांना योग व संगीताचे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व समजावून सांगण्यात आले. डॉ. वैद्य यांनी योगाची प्राचीन परंपरा, जागतिक स्तरावरील महत्त्व आणि दैनंदिन जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासाचे आवाहन केले. वैभव पवार सर व सपना आहेर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुरेल गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. तसेच अशुतोष राशिणकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासनांची प्रभावी प्रात्यक्षिके सादर केली.




शाळेचे प्राचार्य रमेश दिघे, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही योगाभ्यासात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैली, मानसिक स्वास्थ्य आणि संगीताविषयी अभिरुची निर्माण करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## भाजपच्या वतीने योग दिन



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- भारतीय जनता पार्टी संगमनेर शहर मंडळ व पश्चिम मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त गंगामाई घाट येथे सामूहिक योगाभ्यास कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी भाजपचे पदाधिकारी, महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच विविध आघाड्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात योगासने, प्राणायाम व ध्यान साधनेचे प्रात्यक्षिक करण्यात आले. योग हा निरोगी जीवनाचा पाया असून शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारामुळे योगाला जागतिक स्तरावर विशेष ओळख मिळाल्याचेही वक्त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प करत करू योग, राहू निरोग हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.

## उत्तम आरोग्यासाठी योग ही भारताची विश्वाला देणगी - जिल्हा माहिती अधिकारी

युवावार्ता (प्रतिनिधी०

शिर्डी- योग ही भारताने संपूर्ण विश्वाला दिलेली अमूल्य देणगी असून उत्तम आरोग्यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलपासून दूर राहून नियमित योगाभ्यास करावा तसेच मैदानी खेळांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी केले.



भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयांतर्गत केंद्रीय संचार ब्यूरो, अहिल्यानगर यांच्या वतीने माजी सैनिक कै. आर. बी. तथा आप्पा घोडके स्मृती प्रतिष्ठान, महाराष्ट्र प्रांत आणि सूर्यतेज संस्था, कोपरगाव यांच्या विशेष सहकार्याने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सोमैया विद्या मंदिर, लक्ष्मीवाडी येथे योग प्रशिक्षण कार्यक्रम व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, सूर्यतेज संस्थेचे संस्थापक तथा स्वच्छतादूत सुशांत घोडके, केंद्रीय संचार ब्यूरोचे बबलूकुमार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देविदास पाचपाटील, मुख्याध्यापक संजय राऊत, योगतज्ज्ञ प्रशिक्षक संतोष नलगे, महेश थोरात, रोहित काळे, पर्यवेक्षक बाबासाहेब खळदकर, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी योग प्रशिक्षकांनी योगाचे महत्त्व विशद करत ओंकार उच्चारण, सूर्यनमस्कार, पद्मासन, उत्कटासन, पश्चिमोत्तानासन, ताडासन, वृक्षासन, बकासन, उत्तानपादासन, सर्वांगासन आणि हलासन यांसह विविध योगासनांची शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच या आसनांची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. त्यानंतर ध्यान व प्रार्थनेने प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

यावेळी चित्रकला स्पर्धा तसेच योग प्रशिक्षणात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना सन्मानचिन्हे, प्रमाणपत्रे आणि शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत मुख्याध्यापक संजय राऊत यांनी केले, तर प्रास्ताविक सुशांत घोडके यांनी केले. सूत्रसंचालन अनिता शिंदे यांनी केले. ओंकार उच्चारण व गुरुमंत्राने कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षक संजय अमोलिक, राम ढोकचौळे, रुपाली टेके, माधुरी गायकवाड, योगेश चव्हाण, बाळासाहेब जोरी यांच्यासह सोमैया विद्या मंदिरच्या शिक्षक-शिक्षिकांनी विशेष परिश्रम घेतले.

लक्ष्मीवाडीसारख्या ग्रामीण भागात प्रथमच योग प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याने विद्यार्थी आणि पालकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिरात योग दिन

सुमेरू एज्युकेशन सोसायटी संचलित, श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. आजच्या वेगवान, तणावपूर्ण आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य सुदृढ राहणे अत्यंत आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या आरती सप्रा, उपप्राचार्या ज्योतिर्मया चव्हाण तसेच विभागप्रमुखांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विद्यार्थिनी वेदिका कुलकर्णी आणि गौरी शिंदे यांनी आत्मविश्वासपूर्ण सूत्रसंचालन करून उपस्थितांची मने जिंकली. यानंतर विद्यार्थी आराध्या जोंधळे याने योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील उपयुक्तता यावर भाषण केले.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनींनी संगीत शिक्षिका वैशाली देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आओ योग अपनाओ हे योगगीत सादर केले, तर इयत्ता सहावीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या योगनृत्याने कार्यक्रमात रंगत आणली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच योगाबद्दलची जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश या सादरीकरणांतून साध्य झाला. श्री श्री रविशंकरजी यांनी संपूर्ण जगाला योग, प्राणायाम आणि ध्यानाच्या माध्यमातून निरोगी व आनंदी जीवन जगण्याचा संदेश दिला. त्याच विचारांचा वारसा जपत शाळेमध्ये नियमितपणे योग, प्राणायाम आणि ध्यानसाधनेचे प्रशिक्षण दिले जाते. यामुळे विद्यार्थ्यांची कल्पनाशक्ती, निर्णयक्षमता, आकलनक्षक्ती आणि छुप्या गुणांचा विकास होण्यास मोठी मदत होत आहे. यासोबतच आर्ट ऑफ लिव्हिंगच्या 'चाइल्ड सुदर्शन क्रिया' उपक्रमाचाही विद्यार्थ्यांना लाभ मिळत आहे.




आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांवर अभ्यास, परीक्षा, करिअर आणि विविध उपक्रमांचा वाढता ताण असतो. अशा परिस्थितीत योग विद्यार्थ्यांना मानसिक स्थैर्य, एकाग्रता, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन प्रदान करतो.

सांस्कृतिक कार्यक्रमानंतर सामूहिक योगसाधनेचे आयोजन करण्यात आले. क्रीडा शिक्षिका वनिता आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रथम ऊर्जादायी वॉर्म-अप व्यायाम केला. त्यानंतर सूर्यनमस्कार, विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचा सराव करण्यात आला.

श्री श्री रविशंकर विद्यामंदिर ही संस्था विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरती मर्यादित नसून त्यांच्यामध्ये संस्कार, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, सामाजिक बांधिलकी आणि निरोगी जीवनमूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते.

कार्यक्रमासाठी संस्थापिका स्वाती शाह, सेक्रेटरी समीर शाह यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या शिक्षिका संगीता हासे, वैशाली देशपांडे, योग शिक्षिका प्रियंका अत्रे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे हा योग दिन अत्यंत उत्साहात आणि यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# संपादकीय...

## पक्षांतर की राजकीय गरज ?

एकेकाळी स्वतःला शिवसेनेचे वाघ म्हणवून घेणारे अनेक जण आज सत्तेच्या दारात शेपूट घालून बसलेले दिसतात. ज्यांनी आयुष्यभर निष्ठेच्या, विचारांच्या आणि हिंदुत्वाच्या घोषणा दिल्या, तेच आज सत्तेच्या मोहात आपल्या भूमिकांचा आणि तत्त्वांचा लिलाव करताना दिसत आहेत. पण त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी - कोंबडीसमोर टाकलेले दाणे तिचे पोट भरण्यासाठी नसतात; ते तिला जाळ्यात ओढण्यासाठी असतात. सत्तेच्या दारात आज जे दाणे दिसत आहेत, ते उद्याच्या राजकीय कत्तलीची तयारी तर नाही ना, याचाही विचार त्यांनी करायला हवा. जनतेने तुम्हाला पक्षासाठी नव्हे, तर विश्वासासाठी निवडून दिलेले असते. लाखो लोक आपल्या आशा, अपेक्षा आणि स्वप्नं तुमच्यावर सोपवतात. पण निवडून आल्यावर त्याच जनतेच्या भावनांची किंमत कवडीमोल करून दुसऱ्या पक्षात जाणे म्हणजे केवळ पक्षांतर नसते; तो जनतेच्या विश्वासाचा खून असतो. ज्या पक्षाला, ज्या विचारसरणीला जनता नाकारते म्हणून तुम्हाला मत देते, त्याच पक्षात जाऊन बसणाऱ्यांना लाज वाटत नाही का? तुमचा स्वाभिमान नेमका कुठे गहाण पडला? तुमची निष्ठा नेमकी किती रुपयांत विकली गेली? आणि मग या पक्षांतरासाठी दिली जाणारी कारणं तर आणखी हास्यास्पद असतात. माझ्या पत्नीची विचारपूस केली नाही, सांत्वनासाठी आले नाहीत, माझा सन्मान झाला नाही अशी कारणं सांगून जनतेला मूर्ख समजण्याचा प्रयत्न केला जातो. वैयक्तिक नाराजी असू शकते, मतभेद असू शकतात; पण त्यासाठी लाखो मतदारांच्या विश्वासाशी गद्दारी करण्याचा परवाना कुणी दिला? जर निष्ठा म्हणजे काय हे शिकायचं असेल तर पंकजा मुंडे यांच्याकडे पाहायला हवं. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पक्षासाठी आयुष्य झिजवलं. अनेक प्रसंगी वैयक्तिक पातळीवर दुर्लक्ष झाल्याच्या चर्चा झाल्या, तरी पंकजा मुंडे यांनी पक्षाचा त्याग केला नाही. कारण निष्ठा ही सत्तेवर नाही, तर विचारांवर असते. पक्षांतर करणाऱ्या अनेक नेत्यांचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट स्पष्ट दिसते - काही काळासाठी त्यांना पदं मिळतात, मथळे मिळतात, पण जनतेच्या मनातून ते कायमचे पुसले जातात. अनेकांची राजकीय कारकीर्द पक्षांतरानंतर संपुष्टात आली. कारण जनता कदाचित शांत असते, पण विसरभोळी नसते. आज अनेक पुढारी एका पक्षातून दुसऱ्या पक्षात, तिथून तिसऱ्या पक्षात अशा कोलांट्या उड्या मारताना दिसतात. जणू काही राजकारण नव्हे, तर सर्कस सुरू आहे. विचार, तत्त्व, भूमिका, संघर्ष यांना काहीच किंमत उरलेली नाही. फक्त सत्ता, पद आणि स्वतःचा स्वार्थ हेच अंतिम ध्येय बनले आहे. पण लोकशाहीची खरी ताकद नेत्यांकडे नाही; ती मतदारांकडे आहे. त्यामुळे कुणी तलवार उचलण्याची गरज नाही, कुणी बंदूक उचलण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वाभिमान शिकवला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मताचा अधिकार दिला. आज त्या मताची ताकदच सर्वात मोठं शस्त्र आहे. लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर सक्षम विरोधी पक्ष जिवंत राहिला पाहिजे. कारण कोणत्याही सरकारवर अंकुश ठेवण्याचं काम विरोधी पक्ष करतो. विरोधक संपवून टाकणे, फोडणे, गिळंकृत करणे ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असते. सरकार जितकं मजबूत असावं लागतं, तितकाच मजबूत विरोधी पक्षही आवश्यक असतो. आज जे लोक सत्तेच्या मोहापायी विरोधी पक्ष कमकुवत करत आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावं की लोकशाही केवळ निवडणुकांनी टिकत नाही; ती मतभिन्नतेच्या सन्मानाने टिकते. समाजातील अनेक सामान्य नागरिक कोणत्याही पक्षाचे कार्यकर्ते नसतात. ते फक्त इतकीच अपेक्षा करतात की सत्तेला प्रश्न विचारणारा कुणीतरी असावा. अन्यायाविरोधात उभा राहणारा कुणीतरी असावा. विद्यार्थ्यांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारा कुणीतरी असावा. दुर्दैवाने आपण व्यक्तिपूजेत इतके अडकून गेलो आहोत की प्रश्न विचारणाऱ्यांपेक्षा नेत्यांची हुजरेगिरी करणाऱ्यांना जास्त महत्त्व देतो. हीच मानसिक गुलामगिरी लोकशाहीसाठी सर्वात मोठा धोका आहे.

म्हणूनच आता वेळ आली आहे ती जागं होण्याची. पक्षांतर करणाऱ्या, जनतेचा विश्वास विकणाऱ्या, लोकशाहीचा गळा घोटणाऱ्या आणि सत्तेसाठी तत्त्वांचा सौदा करणाऱ्या नेत्यांना मतपेटीतून उत्तर देण्याची. कारण जनता शांत असली तरी शक्तिहीन नाही. आणि जेव्हा जनता जागी होते, तेव्हा कितीही मोठा नेता असला तरी त्याचा पराभव अटळ असतो.

# सी.ए. परीक्षेत यशस्वी झालेल्या शिवेंद्र जगदाळे यांचा सह्याद्री कॉलेजमध्ये गौरव



संगमनेर - सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाजाच्या भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांपैकी शिवेंद्र उमेश जगदाळे यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) अंतिम परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वाणिज्य शाखेतून ९४.३१ टक्के गुण मिळवत तालुक्यात प्रथम आलेल्या शिवेंद्र यांनी सी.ए. परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. एम. खेमनर होते. यावेळी उपप्राचार्य एन. बी. काळे, पर्यवेक्षक प्रा. बी. एस. कुटे व वाणिज्य विभागप्रमुख प्रा. ए. के. दातीर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिवेंद्र यांच्या यशाचे कौतुक केले.

सत्काराला उत्तर देताना शिवेंद्र जगदाळे यांनी आपल्या यशामागे महाविद्यालयातील शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे पाठबळ आणि कुटुंबीयांचे संस्कार यांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून सातत्यपूर्ण परिश्रम करावेत, असे आवाहन केले. यावेळी प्रा. एन. एस. गुंड, प्रा. एम. टी. जगताप, प्रा. एस. के. भालेराव, प्रा. एम. जे. भुसाळ, प्रा. एस. बी. पानसरे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. एन. आर. जगताप यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. पी. पी. वर्पे यांनी केले. शिवेंद्र जगदाळे यांच्या यशामुळे संपूर्ण सह्याद्री परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# योग समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

आजच्या धकाधकीच्या व तणावपूर्ण जीवनात निरोगी राहण्यासाठी योग हा सर्वोत्तम पर्याय असून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योग करणे ही काळाची गरज असल्याचा सल्ला आमदार अमोल खताळ यांनी दिला.

संगमनेर शहरातील गणेशनगर परिसरात पतंजली योग समितीच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या योग दिन कार्यक्रमात आमदार खताळ बोलत होते. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच युवक-युवती उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले की, भारताने जगाला दिलेली योगाची अमूल्य देणगी आज संपूर्ण जग स्वीकारत आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या माध्यमातून योगाचे महत्त्व अधिक व्यापक स्तरावर पोहोचत आहे. प्रत्येक नागरिकाने निरोगी आयुष्यासाठी योगाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अनेकजण विविध शारीरिक व मानसिक तणावांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून शरीर, मन आणि आत्म्याला निरोगी ठेवणारी जीवनशैली आहे. नियमित योगामुळे शरीराची लवचिकता वाढते, मानसिक एकाग्रता सुधारते तसेच अनेक आजारांपासून संरक्षण मिळते, असे आमदार अमोल खताळ यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आमदार अमोल खताळ यांनी त्यांच्या निवासस्थानी विविध योगासने व प्राणायाम केले. आजच्या धकाधकीच्या जीवनात तणावमुक्त आणि ऊर्जावान राहण्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. या योग दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी दररोज आपल्या दिनचर्येत योगाचा समावेश करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन त्यांनी केले.

# निझर्णेश्वर विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - निझर्णेश्वर विद्यालय, कोकणगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका सौ. राहाणे मॅडम यांनी योगाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास, प्राणायाम व ध्यानधारणा करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सामूहिकरित्या विविध योगासने, प्राणायाम व ध्यानसाधना केली. इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्यही जपले जाते, हा संदेश यावेळी देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी कलाशिक्षक श्री. पारासुर सर यांनी आभार मानले.

**SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL**

**Daily Yuvavarta**

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# मालपाणी विद्यालयात योग दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या प्राथमिक विभागात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सौ. गाडेकर मॅडम यांनी योगाचे महत्त्व विशद करताना नियमित योगाभ्यासामुळे शरीर व मन निरोगी राहण्यास मदत होते, तसेच जीवनात सकारात्मकता, आत्मविश्वास आणि शिस्त निर्माण होते, असे सांगितले. यानंतर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, सूर्यनमस्कार तसेच विविध प्राणायाम प्रकारांचा सराव केला. योगाभ्यासादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध आसनांचे प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी योगामुळे एकाग्रता, शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक शांतता आणि आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते, याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण झाली असून निरोगी जीवनाचा संदेश देण्यात आला. विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.


**हरविले आहे**

बजाज सीटी १०० मोटार सायकल क्र. एमएच -१७ सीके -१५१० चे आरसीसी बुक व टी.टी फॉर्म दि. १५/६/२०२६ रोजी हरविले आहे. कोणास सापडल्यास खालील मोबाईलला फोन कराव. योग्य बक्षिस दिले जाईल

८७६६४५१७११

**पाहिजेत**

श्रद्धा एजन्सी

ड्रायव्हर - २ जागा

जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर

— संपर्क —

9665557877

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME ANWAR SHAIKH MAJID SHAIKH

NEW NAME AS ANWAR MAJID SHAIKH

ADD - JEDHE COLONY, NEAR NAGARPALIKA SANGAMNER ,TAL- SANGAMNER, DIST AHMEDNAGAR

**पाहिजेत**

माऊली ग्रीन सोल्युशन येथे कामासाठी मुले पाहिजेत

सोलर, सीसीटिव्ही, संगणक सिस्टीममध्ये तांत्रिकज्ञान आवश्यक

7588095215

7888095215

**पाहिजेत**

आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.

हेल्पर - ०२

ड्रायव्हर - ०१

सेल्समन - ०१

संपर्क- नेहरु चौक, संगमनेर

9922113534

9730468090

**भाड्याने देणे**

संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.

संपर्क

9922008706

**पाहिजेत**

संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.

टू व्हिलर आवश्यक

8999795056

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर श्री गणेश टायर्स या फर्मसाठी

सेल्समन -3

सुपर कॅरी ड्रायव्हर - 1

कामाचा अनुभव आवश्यक

9423793758

**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५

महिला - ३

सफाई कर्मचारी - ५

हेल्पर - ५

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846

**भाड्याने देणे आहे**

संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी

२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे

- पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन
- वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
- थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध
- व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा

पत्ता : नाशिक - पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर

- संपर्क -

9822258458

**पाहिजेत**

इथापे इन्स्टिटयूट करीता खालील पदे भरणे आहेत

अकाऊंटट -३ क्लार्क -३

ड्रायव्हर-३ वॉचमन- ३

तरी संबंधीतांनी आपल्या मुळ कागदपत्रांसह समक्ष भेटावे

**पाहिजेत**

डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)

पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल

रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक

ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)

माधवबाग क्लिनिक

९३२५०२८६८६






# अकोलेत पोलिसांची कारवाई

## पावणेदोन लाखांचा अवैध मद्यसाठा नष्ट



एआय फोटो

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- अवैध दारूच्या विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेला पावणेदोन लाख रुपयांचा देशी-विदेशी मद्यसाठा अकोले पोलिसांनी नियमानुसार नष्ट केला आहे. या कारवाईमुळे बेकायदेशीर धंदेवाल्यांना जोरदार दणका बसला असून अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अकोले पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या तब्बल ४९ गुन्ह्यांमधील हा मद्यसाठा होता. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तो नष्ट करण्यात आला.

नूतन पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांनी पदभार स्वीकारताच अवैध व्यवसायांविरोधात आक्रमक मोहीम सुरू केली आहे. हातभट्टी, अवैध दारू विक्री आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर पोलिसांची करडी नजर आहे. गुन्हेगारांना अभय नाही आणि कायद्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही, असा थेट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. यामुळे अवैध धंद्यांच्या आडून पैसा कमावणाऱ्यांचे धाबे दणाणले असून तालुक्यात पोलिसांच्या धडक कारवाईचे स्वागत होत आहे.अवैध दारू विक्री, हातभट्टी किंवा कोणत्याही बेकायदेशीर व्यवसायाची माहिती नागरिकांनी तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. अकोले तालुका गुन्हेमुक्त आणि व्यसनमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त करत पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला आहे. आगामी काळात दारूमाफिया आणि इतर बेकायदेशीर धंदेवाल्यांचे आव्हान नूतन पोलीस निरीक्षक संदीप कोळी मोडीत काढतात का, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# राजकीय गद्दारीविरोधात माकप करणार आंदोलन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - महाविकास आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आलेल्या सहा खासदारांनी अलीकडेच शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केल्याच्या पार्श्वभूमीवर भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) अर्थात माकपने राज्यभर तीव्र निदर्शने करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या वतीने गद्दारीच्या राजकारणाविरोधात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून विविध ठिकाणी आंदोलने, निदर्शने आणि निषेध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत.

माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीत लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संविधान रक्षणाच्या भूमिकेवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना डाव्या पक्षांनी आणि जनसंघटनांनी सक्रिय पाठिंबा दिला होता. भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांविरोधात प्रचार करत राज्यभरातील कार्यकर्त्यांनी या उमेदवारांच्या विजयासाठी मोठे योगदान दिले होते.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीविरोधात जनतेमध्ये तीव्र नाराजी होती. तसेच कांदा आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून सत्ताधारी पक्षांविरोधात असंतोष निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर मतदारांनी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून दिले. मात्र, निवडून आल्यानंतर त्याच भाजपला अप्रत्यक्ष पाठिंबा देणाऱ्या सत्ताधारी आघाडीत जाणे हा जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा विश्वासघात असल्याचा आरोप माकपने केला आहे.

डॉ. नवले यांनी यापूर्वी झालेल्या आमदारांच्या पक्षांतरांचाही उल्लेख केला. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून निवडून आलेल्या अनेक लोकप्रतिनिधींनी नंतर सत्ताधारी पक्षांची वाट धरल्याने मतदारांचा विश्वास डळमळीत होत असल्याचे त्यांनी नमूद केले. माकपने महाविकास आघाडीतील पक्षांनाही आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आहे. केवळ आर्थिक बळ आणि निवडणूक जिंकण्याची क्षमता यांना प्राधान्य देण्याऐवजी विचारनिष्ठ, तत्त्वनिष्ठ आणि जनतेशी बांधिलकी असलेल्या कार्यकर्त्यांना संधी देण्याची गरज असल्याचे पक्षाने म्हटले आहे.

लोकशाही बळकट करण्यासाठी पक्षांतराच्या प्रवृत्तीवर कठोर नियंत्रण, निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेचे संरक्षण आणि व्यापक निवडणूक सुधारणा आवश्यक असल्याची भूमिका माकपने मांडली आहे. विकास निधीचा वापर राजकीय दबावाचे साधन म्हणून होत असल्याचा आरोप करत, त्यामागे कमिशन आणि टक्केवारीच्या राजकारणाला खतपाणी घातले जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर माकपच्या सर्व शाखा, जनसंघटना आणि वर्गीय संघटनांच्या माध्यमातून राज्यभर जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. पक्षांतराच्या राजकारणाविरोधात जनमत तयार करण्यासाठी निदर्शने, निषेध मोर्चे आणि विविध आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे डॉ. अजित नवले यांनी स्पष्ट केले आहे.

# कॉटेज हॉस्पिटलच्या नूतनीकरणासाठी आमदार अमोल खताळ यांना निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर नगरपरिषदेच्या अखत्यारीतील ऐतिहासिक कॉटेज हॉस्पिटलचे नूतनीकरण करून ते १०० खाटांच्या महिला रुग्णालयात रूपांतरित करावे तसेच अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी संगमनेरचे नागरिक विजयकुमार प्रभाकर ठाकूर यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सन १९४३ मध्ये स्थापन झालेले कॉटेज हॉस्पिटल हे जिल्ह्यातील पहिले ग्रामीण सरकारी रुग्णालय असून लाखो नागरिकांनी येथे उपचार घेतले आहेत. मात्र ग्रामीण रुग्णालय घुलेवाडी येथे स्थलांतरित झाल्यानंतर या रुग्णालयाची दुरावस्था झाली असून आवश्यक वैद्यकीय यंत्रसामग्री, डॉक्टर व कर्मचारी वर्गाचा अभाव असल्याने रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

खासगी रुग्णालयांवरील वाढते अवलंबित्व आणि महागडे उपचार यामुळे सामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांवर मोठा भार पडत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कॉटेज हॉस्पिटलमध्ये एक्स-रे, सीटी स्कॅनसह इतर अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

आमदार अमोल खताळ यांनी निवडणुकीदरम्यान कॉटेज हॉस्पिटलच्या नूतनीकरणाचे आश्वासन दिले होते. त्या पार्श्वभूमीवर शासन निधीतून या ठिकाणी सर्व सुविधांनी सुसज्ज रुग्णालय उभारून डॉक्टर व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी विजयकुमार ठाकूर यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# मुलीला वाचवण्यासाठी बाप बिबट्याशी भिडला



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले तालुक्यातील डोंगरगावच्या गुंजाळ वस्तीवर शनिवारी रात्री घडलेल्या थरारक घटनेत एका चार वर्षीय बालिकेवर बिबट्याने हल्ला करून तिला जखमी केले. मात्र, वडील मनोज गुंजाळ यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बिबट्याशी झुंज देत मुलीची सुटका केली. त्यानंतर जीव वाचविण्यासाठी धावत असताना अंधारामुळे बाप-लेकींचा तोल जाऊन ते खोल विहिरीत पडले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे दोघांनाही सुखरूप बाहेर काढण्यात आले असून त्यांच्यावर सध्या संगमनेर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अवनी मनोज गुंजाळ असे जखमी बालिकेचे नाव आहे.

डोंगरगाव शिवारात शुक्रवारी रात्री ही अंगावर शहारे आणणारी घटना घडली. अवनी तिच्या आईसोबत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक तिच्यावर झडप घातली. बिबट्याने अवनीला जबड्यात पकडून अंधाराच्या दिशेने ओढण्यास सुरुवात केली. मुलीच्या आईचा आरडाओरडा ऐकून जवळच असलेले वडील मनोज गुंजाळ धावून आले. त्यांनी धाडसाने बिबट्याशी सामना करत मुलीची सुटका केली. जखमी अवस्थेतील अवनीला कडेवर घेऊन ते घराच्या दिशेने धावू लागले. मात्र, दाट अंधारामुळे वाटेत असलेल्या विहिरीचा अंदाज न आल्याने दोघेही विहिरीत पडले.

प्रसंगावधान राखत मनोज गुंजाळ यांनी मुलीला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. विहिरीत पडल्याचा आवाज आणि कुटुंबीयांचा आक्रोश ऐकून ग्रामस्थ घटनास्थळी धावले. त्यांनी दोघांनाही विहिरीतून बाहेर काढून तत्काळ उपचारासाठी संगमनेर येथे हलविले. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच रुग्णालयात जाऊन जखमी बाप-लेकींची विचारपूस केली. दरम्यान, डोंगरगाव परिसरात बिबट्याचा वारंवार वावर असूनही वन विभागाकडून प्रभावी उपाययोजना होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने पिंजरा लावावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# अधिवेशनाच्या पहिल्याच...

पान १ वरून - आणि विविध प्रशासकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. महसुली खात्यांतर्गत एकूण ६९ हजार ६०१ कोटी रुपयांहून अधिक खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ३ हजार ३० कोटी रुपये भारित खर्च असून उर्वरित ६६ हजार ५७० कोटी रुपये मतदेय खर्च आहेत. राज्याच्या विकासकामे, पायाभूत सुविधा आणि विविध प्रकल्पांसाठी भांडवली खात्यावर २८ हजार १०४ कोटी रुपयांहून अधिक निधीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. या पुरवणी मागण्यांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडणार असला तरी विकासकामांना गती देणे, कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरू ठेवणे आणि तातडीच्या खर्चांची पूर्तता करणे यासाठी या तरतुदी अत्यावश्यक असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. पावसाळी अधिवेशनात या मागण्यांना मंजुरी मिळण्याची दाट शक्यता असून राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनाबाबत पुढील काही दिवसांत जोरदार चर्चा होण्याची चिन्हे आहेत.

# संस्कृतप्रेमी शिक्षिका शकुंतला खोजे यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

संस्कृत भारती परिवारातील बालकेंद्र उपक्रमाच्या सहसंयोजिका, नवीन नगर रोड येथील बालकेंद्राच्या समर्पित प्रशिक्षिका तसेच रू. दा. मालपाणी विद्यालयातील संस्कृत विषयाच्या माजी अध्यापिका शकुंतला खोजे यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने अकाली निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच शैक्षणिक, सामाजिक व संस्कृतप्रेमी क्षेत्रात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

संस्कृत भाषा, भारतीय संस्कृती आणि सुसंस्कारांचा प्रसार करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर समर्पित भावनेने कार्य केले. संस्कृत भारतीच्या बालकेंद्र उपक्रमातून त्यांनी असंख्य बालकांमध्ये संस्कृत भाषेची आवड निर्माण केली. त्याचबरोबर राष्ट्रभक्ती, नैतिक मूल्ये आणि भारतीय संस्कार यांची जपणूक करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.



रू. दा. मालपाणी विद्यालयात संस्कृत विषयाच्या अध्यापिका म्हणून कार्यरत असताना त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाची गोडी लावली. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे, कार्यनिष्ठेमुळे आणि सेवाभावी वृत्तीमुळे त्या विद्यार्थी, पालक आणि सहकाऱ्यांमध्ये लोकप्रिय होत्या. त्यांच्या निधनाने संस्कृत भारती परिवाराने एक समर्पित कार्यकर्ती, कुशल प्रशिक्षिका आणि संस्कृतप्रेमी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा आणि त्यांनी दिलेले संस्कार कायम स्मरणात राहतील.

त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक आणि मोठा मित्रपरिवार असा परिवार आहे.

# संगमनेरमध्ये भेसळयुक्त...

पान १ वरून -

घेण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जिल्ह्यात यापूर्वी उघडकीस आलेल्या दूध भेसळ व कृत्रिम दूध प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याची आवश्यकता असल्याचे महासंघाने नमूद केले आहे.

भेसळयुक्त व निकृष्ट दर्जाच्या दुधामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती अन्न व औषध विभागाचे मंत्री, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, मुख्याधिकारी संगमनेर नगर परिषद आणि नगराध्यक्ष संगमनेर नगर परिषद यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणी प्रशासन कोणती भूमिका घेते याकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

# संचिता उगले : स्वप्नांच्या दुनियेतील अकाली अस्त

ग्रामीण आदिवासी भागातील तरुणी मुंबई च्या चंदेरी दुनियेत नाव कमविण्यासाठी येते पण येथील व्यवस्थेची ती बळी ठरते. मराठी आणि हिंदी मनोरंजन क्षेत्रात अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी युवा अभिनेत्री संचिता उगले हिचे अवघ्या वयाच्या २५ व्या वर्षी मुंबईतील वर्सोवा येथील राहत्या घरी तिने गळफास घेऊन जीवन संपवल्याची घटना घडली. मनोरंजन विश्वात तसेच तिच्या चाहत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

संचिता उगले अकोले तालुक्यातील डोंगरगाव येथील मूळ रहिवासी तिचे वडील मच्छिंद्र उगले शेतकरी तर आई जयश्री गृहिणी आहे. डोंगरगाव येथे संचिताचे बालपण गेले. तिने गावातील मराठी शाळेत चौथीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर कुटुंब मुंबईत स्थायिक झाल्याने पुढील शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले. लहानपणापासूनच अभिनयाची आवड जोपासत तिने मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर रुपेरी दुनियेत आपले स्थान निर्माण केले होते.



संचिता उगले हिने मराठी आणि हिंदी मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला होता. कुमकुम भाग्य या झी टीव्ही वरील मालिका संचिता यांच्या कारकिर्दीतील हा सर्वात मोठा 'टर्निंग पॉईंट' ठरला. या लोकप्रिय मालिकेत त्यांनी 'दिया टंडन' ही व्यक्तिरेखा साकारली होती, ज्यामुळे त्यांना घराघरात ओळख मिळाली. वागळे की दुनिया या सोनी टिव्ही च्या अत्यंत लोकप्रिय कौटुंबिक मालिकेत त्यांनी 'रुचिता जेटली' ही भूमिका साकारून प्रेक्षकांची मने जिंकली. दिलवाली दुल्हा ले जाएगी दंगल टिव्ही च्या मालिकेत त्यांना मुख्य अभिनेत्री म्हणून काम करण्याची मोठी संधी मिळाली. यात त्यांनी साकारलेली 'सुकून' ही व्यक्तिरेखा खूप गाजली. छावा या विकी कौशल यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या भव्य ऐतिहासिक चित्रपटात संचिता यांनी तरुण महाराणी ताराराणी यांची अत्यंत महत्त्वाची भूमिका साकारली होती. सायलन्स २ या मनोज बाजपेयी यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या थ्रिलर ओटीटी चित्रपटातही त्या एका भूमिकेत झळकल्या होत्या. क्राईम आज कल या क्राईम थ्रिलर शोचाही त्या एक भाग होत्या. टीव्ही आणि चित्रपटांशिवाय संचिता यांनी अनेक नामांकित ब्रॅंड्सच्या मॉडेलिंग आणि जाहिरातींमध्ये काम केले होते. त्यात पार्ले-जी कॅडबरी व्हिस्पर यांचा समावेश होता.

चित्रपटसृष्टी म्हणजे स्वप्नांची दुनिया असे म्हटले जाते. चमकदार प्रकाश, मोठे पडदे, प्रसिद्धी आणि यश यामुळे अनेक तरुण-तरुणी या क्षेत्राकडे आकर्षित होतात. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींसाठी ही दुनिया एक मोठे स्वप्न घेऊन येते आपलं नाव मोठं करायचं, स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करायचं.

ग्रामीण भागातील मुली साध्या कुटुंबातून, मर्यादित साधन संपत्तीमध्ये वाढलेल्या असतात. त्यांच्याकडे प्रचंड मेहनत करण्याची तयारी, प्रामाणिकपणा आणि संघर्षाची ताकद असते. शिक्षण, कला, नृत्य, अभिनय यामध्ये त्या चमक दाखवतात. त्यामुळे फिल्म इंडस्ट्रीत जाण्याची त्यांची इच्छा नैसर्गिक असते. चित्रपटसृष्टीत यश मिळाल्यास प्रसिद्धी, पैसा आणि सामाजिक ओळख मिळते. सोशल मीडिया आणि टीव्हीमुळे हे आकर्षण आणखी वाढले आहे. अनेकजण एका रात्रीत स्टार होण्याचे स्वप्न पाहतात. पण प्रत्यक्षात ही वाट सोपी नसते.

फिल्म इंडस्ट्रीत प्रवेश मिळवणे जितके कठीण आहे, तितकेच तिथे टिकून राहणेही अवघड आहे. काही प्रमुख आव्हाने अशी असतात: तीव्र स्पर्धा, सतत नकार मिळणे, आर्थिक अनिश्चितता, ओळखींचा आणि नेटवर्कचा प्रभाव, सलग चौदा पंधरा तास काम, अवेळी जेवण, अपुरी झोप यामुळे त्यांच्यावर ताण येतो. ग्रामीण भागातून आलेल्या मुलींसाठी हे सर्व अधिक आव्हानात्मक ठरू शकते, कारण त्यांना शहरातील वातावरण, भाषा, आणि जीवनशैलीशी जुळवून घ्यावे लागते. यश न मिळाल्याने किंवा सतत अपयश आल्याने अनेक वेळा मानसिक तणाव वाढतो. काही वेळा अपेक्षा आणि वास्तव यामध्ये मोठी दरी निर्माण होते.

प्रत्येक क्षेत्रात मेहनत आणि वेळ लागतो. तसेच कोणत्याही व्यक्तीच्या मानसिक आरोग्याबद्दल खुलेपणाने बोलणे, मदत घेणे याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील मुली असोत किंवा शहरी-त्यांचे स्वप्न, संघर्ष आणि भावना समान असतात. फिल्म इंडस्ट्री हे संधींचे क्षेत्र आहे, पण तितकेच कठोरही आहे. त्यामुळे यशाबरोबरच मानसिक स्थैर्य, योग्य मार्गदर्शन आणि वास्तवाची जाणीव असणे हेच खरे यशाचे सूत्र आहे.

संचिता यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, मुंबईसारख्या शहरात टिकून राहणे आणि 'आऊटसायडर' म्हणून बॉलिवूड चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका मिळवणे खूप कठीण असते. त्यामुळे त्या टीव्ही मालिकांमधील चांगल्या भूमिकांना प्राधान्य देत होत्या. त्यांनी आपल्या बेधडक स्वभावाने ग्लॅमर इंडस्ट्रीतील कटू सत्यही मांडले होते. एका मुख्य भूमिकेसाठी निवड झाली असतानाही अगदी शेवटच्या क्षणी त्यांना मालिकेतून बदलण्यात करण्यात आले होते, ज्याचा त्यांना मानसिक धक्का बसला होता. काही काळापूर्वी संचिताने सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सवर येणाऱ्या मानसिक दबावावर चिंता व्यक्त केली होती आणि तरुण पिढी या ऑनलाइन व्हॅलिडेशनला बळी पडत असल्याचे म्हटले होते. त्यांच्या जाण्याने इंडस्ट्रीने एक उत्तम आणि स्पष्टवक्ता तरुण कलाकार गमावला आहे

संचिता च्या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन 'ऑल इंडिया सिने वर्कर्स असोसिएशन'ने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणाच्या निष्पक्ष चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याची मागणी केली आहे. ग्लॅमर इंडस्ट्रीतील कलाकारांवर वाढणारा मानसिक छळ थांबवण्यासाठी ही चौकशी गरजेची असल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे.

**भाऊसाहेब वाकचौरे**
**कळस बु., ता. अकोले**

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
“शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी”
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर , संगमनेर

# फिफा वर्ल्ड कपच्या पार्श्वभूमीवर संगमनेरमध्ये फुटबॉलचा महोत्सव





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सह्याद्री डोंगराच्या कुशीत आंतरराष्ट्रीय पातळीची फुटबॉल ग्राउंडची साईज ठेवून बनवण्यात आलेल्या नवीन लोकनेते बाळासाहेब थोरात फुटबॉल मैदानावर रिमझिम पावसात भिजत आनंद घेत उपस्थित हजारो संगमनेरकरांनी फुटबॉल फिव्हर २०२६ चा मनसोक्त आनंद घेतला. याचबरोबर या वेगवान व अचूक खेळाचे जगभरात सर्वाधिक जास्त चाहते असून संगमनेर मधील नागरिकांनी या खेळाचा आनंद घ्यावा व खेळातून अनेक गुणवंत खेळाडू तयार व्हावेत अशी अपेक्षा माजी महसूल व शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली.

वेल्हाळे परिसरात अमृतवाहिनी शिक्षण संस्थेच्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय साईजचे अद्यावत लोकनेते बाळासाहेब थोरात फुटबॉल मैदानाचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अत्यंत रिमझिम पावसात संगमनेर फुटबॉल क्लब व एवरेस्ट फुटबॉल क्लब यांच्यामध्ये प्रदर्शनीय सामना झाला. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. सत्यजित तांबे, पांडुरंग पा. घुले, लक्ष्मणराव कुटे, शंकरराव खेमनर, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, सुधाकर जोशी, अजय फटांगरे, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे, मोहनराव करंजकर, राजेंद्र गुंजाळ, तुळशिनाथ भोर, विलास वर्पे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी.धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. बी.एम. लोंढे, डॉ. मच्छिंद्र चव्हाण, डॉ.मनोज शिरभाते, विलास भाटे, सौ.जे.बी.सेठी, अंजली कन्नावार, नामदेव गायकवाड, फुटबॉल खेळाडू अनिल दिघे, संदीप जोर्वेकर, विश्वकर्मा, प्रा.बाळासाहेब शिंदे, डॉ. सुनील सांगळे, प्रा. जी. बी. बाचकर, निखिल पापडेजा यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डोंगराच्या कुशीत नैसर्गिक पायर्यांवर अत्यंत सुंदर असणाऱ्या या क्रीडा मैदानाचे उद्घाटन यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संगमनेर हौशी फुटबॉल प्रेमी, एवरेस्ट फुटबॉल क्लब, ध्रुव ग्लोबल अकॅडमी, अमृतवाहिनी निडो इंटरनॅशनल स्कूल, डेंटल कॉलेज यांसह विविध फुटबॉल संघाचे अत्यंत थरारक सामने झाले. यावेळी शुभेच्छा देताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, सध्या जगामध्ये फिफा वर्ल्ड कप सुरू असून संपूर्ण जगामध्ये याचा फीवर आहे. फुटबॉल हा सर्वात वेगवान खेळ असून जगातील सर्वात जास्त देशांमध्ये खेळला जातो. या खेळाची लोकप्रियता मोठी आहे. अत्यंत लहान देशही हा खेळ खेळत असून संकटातील देश सुद्धा या खेळात मोठ्या आनंदाने सहभागी होतात. सध्या फिफाच्या वर्ल्डकप मुळे जगाला या खेळाची मोठ्या आनंदाची पर्वणी सुरू आहे.

कॅनडा, अमेरिका, युरोप, फ्रान्स यांसह अनेक देशांमध्ये हा खेळ खेळला जात असून त्यांचा उद्घाटन सोहळा हा खूप दिमाखदार व आपल्या कित्येक पटीने पुढे आहे. या उद्घाटन सोहळ्यामध्ये भारतीयांचा सहभाग असून पारंपारिक नृत्य त्यांनी सादर केले आहे. जगाबरोबर संगमनेर मध्येही या खेळाची आवड निर्माण व्हावी याकरता आंतरराष्ट्रीय साईजचे मैदान बनवण्यात आले असून भविष्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मैदान बनवण्यासाठी आपला प्रयत्न राहणार आहे. याचबरोबर शेजारी क्रिकेटचे भव्य मैदानही केले जाणार आहे. क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे हा आपल्या शेतकरी कुटुंबातील असून त्याला संधी मिळाली त्यांनी शिक्षण घेतले कष्ट केले आणि जागतिक पातळीवर आपले नाव केले.

याचबरोबर पाणी हे जीवन आहे. पाऊस येणे अत्यंत गरजेचे आहे अशी प्रार्थना करताना पाण्याचा जपून वापर करा खेळाचा आनंद घ्या कारण जीवनामध्ये पाणी आणि आरोग्य याचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे ते म्हणाले.

आ. सत्यजित तांबे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर मध्ये युवकांना आंतरराष्ट्रीय साईझचे फुटबॉल स्टेडियम उपलब्ध झाले आहे. यामधून अनेकांना फुटबॉलचा आनंद घेता येणार आहे. खेळ हा मनाला व जीवनाला आनंद देणारा असून निरोगी जीवनासाठी मैदानी खेळ महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले.

# रेल्वेसाठी प्रयत्न सुरूच ठेवणार - आ. खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रेल्वे मंत्रालयाने पुणे जिल्ह्यातील खोडद येथील जीएमआरटीचे कारण पुढे करत संगमनेर मार्गे प्रस्तावित पुणे-नाशिक रेल्वे मार्ग प्रकल्प रद्द करण्याचा घेतलेला निर्णय धक्कादायक आहे. हा रेल्वे मार्ग पुन्हा मंजूर व्हावा, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा प्रयत्न करणार आहे. याबाबत संगमनेर तालुक्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन सर्वतोपरी संघर्षाची तयारी असल्याचा निर्धार आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रस्तावित संगमनेर मार्गे जाणारा पुणे-नाशिक रेल्वे मार्ग रद्द केला. याबाबत माध्यमांशी बोलताना आमदार खताळ म्हणाले की, दूरसंचार केंद्राने स्वतः रेल्वे मंत्रालयाला पत्र देऊन प्रस्तावित रेल्वे मार्गापासून सुमारे १० किलोमीटर अंतरावरून मार्ग नेण्यास कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट केले होते. असे असतानाही रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी पुणे-नाशिक रेल्वे मार्ग प्रकल्प रद्द करण्याची घोषणा करणे ही बाब संगमनेरकरांच्या दृष्टीने अन्यायकारक आहे.

या प्रकल्पासाठी संगमनेर तालुक्यात अनेक ठिकाणी भूसंपादन प्रक्रिया पार पडली होती. अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या असून त्यांना शेकडो कोटी रुपयांची भरपाई देखील मिळाली आहे. प्रकल्पाची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात पुढे गेलेली असताना अचानक मार्ग बदलणे आणि अखेर प्रकल्पच रद्द करणे हे स्थानिक नागरिक, शेतकरी आणि व्यापारी वर्गासाठी मोठा धक्का आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

# एसटी आर्थिक संकटात

## सेवा ठप्पची भीती; ६३३ कोटींची देणी थकली

मुंबई (वृत्तसंस्था)

एसटी महामंडळ सध्या अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीतून जात आहे. इंधन, गाड्यांची दुरुस्ती आणि इतर दैनंदिन खर्चासाठी महामंडळाकडे आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने आगामी काळात राज्यातील एसटी सेवा पूर्णपणे ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे. 'महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस'चे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी या गंभीर परिस्थितीबाबत प्रशासनाला आणि सरकारला इशारा दिला आहे. एसटी महामंडळाकडे सध्या टोल, डिझेल, सुटे भाग पुरवठादार, गाड्यांची देखभाल-दुरुस्ती तसेच भाडेतत्त्वावरील बसेसची मोठी देयके प्रलंबित आहेत. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, कर्मचाऱ्यांच्या पगारातून कापून घेतलेली रक्कमही संबंधित संस्थांकडे जमा करण्यात आलेली नाही. डिसेंबर २०२५ ते मे २०२६ या अवघ्या ६ महिन्यांच्या कालावधीत कर्मचाऱ्यांची तब्बल ६३३ कोटी २ लाख रुपयांची देणी थकीत आहेत. या थकीत रकमांमध्ये भविष्य निर्वाह निधी (झत्र), ग्रॅच्युईटी, रजा रोखीकरण, वैद्यकीय व प्रवास भत्ते, कर्मचाऱ्यांच्या बँक कर्जाचे हप्ते या बाबींचा समावेश आहे. महामंडळासमोर दर महिन्याला वाढणारी आर्थिक तूट हे सर्वात मोठे आव्हान बनले आहे. या सातत्याने वाढणाऱ्या तुटीमुळे एसटीचा गाडा पुढे कसा हाकायचा, असा यक्षप्रश्न आता एसटी व्यवस्थापनासमोर उभा ठाकला आहे.

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
♦ मासिक पाळीच्या तक्रारी
♦ अंगावरून पांढरे जाणे
♦ गर्भ न रहाणे
♦ वारंवार गर्भपात होणे
♦ गर्भाशयात गाठी
♦ गर्भाशयाचा कर्करोग
♦ स्तनांची वाढ न होणे
♦ स्तनातून दूध न येणे
♦ स्तनात गाठी
♦ स्तनाचा कर्करोग
♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ गुप्त अंगाला खाज
♦ विविध त्वचा विकार
♦ गुप्तरोग, गर्मी
♦ लघवीला जळजळ
♦ संभोगात रस न येणे
♦ संभोगा विषयीची भीती
♦ हस्तमैथूनाची सवय
♦ लैंगिक विकृती
♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

दर्शन
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70%
डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क
पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर
422605

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
• हृदयरोग (Heart Diseases)
• मेंदूरोग (Brain Diseases)
• कर्करोग शस्त्रक्रिया
• अपघात (Accident)
• लहान बालकांची शस्त्रक्रिया
• गुडघ्याचे प्रत्यारोपण
• विद्युत अपघात रुग्ण
• कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
• डायलिसिस
• अपघात शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण
• मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25